आणीबाणीत संविधानाचा गळा घोटल्याबद्दल काँग्रेस माफी मागणार का? खा. रविशंकर प्रसाद यांचा सवाल

मुंबई दि.२७. (प्रतिनिधी): आणीबाणीच्या काळात अनेक घटना दुरुस्त्या करून संविधानाचा गळा घोटण्यात आला. आणीबाणीत सर्व देशाचा तुरुंग बनवून विरोधी कार्यकर्त्यांचा छळ केल्याबद्दल, जबरदस्तीने नसबंदी शस्त्रक्रिया करुन सामान्य जनतेवर अत्याचार केल्याबद्दल काँग्रेस नेते माफी मागणार का? असा सवाल माजी केंद्रीय मंत्री खा. रविशंकर प्रसाद यांनी केला.

आणीबाणीला ५९ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आणीबाणीत दीड लाख लोकांना देशभर अटक करण्यात आली होती. जनसंघ, समाजवादी अशा सर्व प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्यांना अटक करण्यात आली. लोकनायक जयप्रकाश नारायण यांना अटक करून हरयाणात तुरुंगात ठेवण्यात आले होते. त्याच तुरुंगात मोरारजी देसाई यांनाही ठेवण्यात आले होते. मात्र या दोघांना भेटण्याची परवानगी नाकारली गेली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांना, जनसंघाच्या कार्यकर्त्यांचा तुरुंगात शारीरिक छळ करण्यात आला होता .

यावेळी खा. प्रसाद यांनी आणीबाणीत झालेल्या अत्याचारांचा पाढा वाचला. आणीबाणी काळात २५३ पत्रकारांना अटक करण्यात आली होती. त्यापैकी ११० पत्रकारांना मिसा खाली तर ११० जणांना संरक्षणविषयक कायद्यानुसार अटक करण्यात आली. ३३ जणांना अन्य गंभीर गुन्ह्याखाली अटक करण्यात आली. अनेक ज्येष्ठ संपादकांनाही अटक करण्यात आली होती. ५२ विदेशी पत्रकारांची मान्यता रद्द करण्यात आली. ख्यातनाम पत्रकार मार्क टली सह २९ विदेशी पत्रकारांना भारतात प्रवेश करण्यास बंदी घातली गेली. वृत्तपत्रांवर प्रसिद्धी पूर्व निर्बंध घालण्यात आले होते असेही सांगितले. सरकारी अधिकाऱ्यांना उद्दिष्ट ठरवून दिले जात असे. ६० लाख लोकांची जबरदस्तीने नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आली. अनेकांचा विवाह झाला नसताना त्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आली, असेही खा. प्रसाद यांनी नमूद केले. या अत्याचाराबद्दल काँग्रेस नेत्यांनी आजवर माफी मागितली नाही, असेही खा. प्रसाद यांनी सांगितले.

नवी मुंबईत आणीबाणीच्या कालखंडाविषयी विविध उपक्रमांतून लोकशाहीचा जागर

लोकशाहीत प्रशासन जितके मजबूत तितकी लोकशाही समर्थ राहील. त्यामुळे सर्वांचीच जबाबदारी मोठी असल्याचे सांगत इतिहासात जे काही वाईट घडले त्याचे स्मरण ठेवून पुन्हा तशा गोष्टी घडू नयेत याकरिता आपण सर्वांनी जागरुक व्हावे यादृष्टीने आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण होत असताना विविध कार्यक्रम करण्याची संकल्पना पंतप्रधान महोदयांनी मांडली अशा शब्दात महाराष्ट्र राज्याचे वन मंत्री ना.श्री.गणेश नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संविधान हे आपल्याला जगण्याची मूल्ये शिकवते व कर्तव्याचे भान देते, त्यामुळे त्याचा जीवनात अंगिकार करावा असेही त्यांनी प्रतिपादन केले. भारतात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू झाली त्या घटनेला ५० वर्षे पूर्ण होत असताना केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार सर्वत्र विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यास अनुसरून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित विशेष कार्यक्रमाप्रसंगी ते मनोगत व्यक्त करीत होते.

याप्रसंगी वन मंत्री ना.श्री.गणेश नाईक यांच्यासह बेलापूर विधानसभा सदस्य आ.श्रीम.मंदाताई म्हात्रे, आ.श्री.शरद सोनावणे, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार तसेच महापालिका विभागप्रमुख, अधिकारी, माजी नगरसेवक मंचावर उपस्थित होते. आ.मंदाताई म्हात्रे यांनी यावेळी बोलताना कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणावर उपस्थिती पाहून समाधान व्यक्त करीत देशाच्या भविष्यातील नागरिकांना इतिहासातील घटनांची माहिती मिळून लोकशाहीचे व संविधानाचे महत्व त्यांच्या मनात रुजवण्यासाठी हा कार्यक्रम महत्वाचे असल्याचे सांगितले. म हापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी संविधानाने दिलेले म ूलभूत अधिकार जगण्यासाठी किती महत्वाचे असतात याबाबत समाज प्रबोधन व्हावे यादृष्टीने आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण होत असताना केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशानुसार आयोजित केला जाणारा कार्यक्रम लोकशाहीचे महत्व अधोरेखित करणारा असल्याचे मत व्यक्त केले. अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांनी प्रास्ताविकपर मनोगतात घटनेने नागरिकांना दिलेले अधिकार व कर्तव्य याची जाणीव जागृती करण्यासाठी महानगरपालिका 'हर घर संविधान' हा अभिनव उपक्रम राबवित असल्याची माहिती दिली. वेद काळापासून या देशात लोकशाही मूल्यव्यवस्था कार्यरत असून त्यानंतरही सम्राट अशोकाचे शिलालेख, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि देशभरातील विविध राज्यांमध्ये लोकशाही मार्गाने सुरु असलेली प्रशासकीय व्यवस्था याचा सविस्तर आढावा त्यांनी घेतला.

या निमित्त विष्णुदास भावे नाट्यगृहाच्या भव्यतम पॅसेजम ध्ये प्रदर्शित करण्यात आलेल्या आणीबाणीविषयक छायाचित्र प्रदर्शनाचा शुभारंभ वनमंत्री ना.श्री.गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रदर्शनामध्ये भारतात प्राचीन काळापासून सुरु असलेल्या लोकशाही व्यवस्थेची चित्रांकित माहिती तसेच आणीबाणीच्या काळातील घडामोडी आणि लोकशाही रक्षणासाठी लढणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची माहिती आहे. त्याचप्रमाणे लोकशाहीच्या सबलीकरणासाठी सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी उपक्रम, योजना यांचीही माहिती प्रदर्शित करण्यात आली आहे. या कार्यक्रमास अनुसरुन वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून सेक्टर १६ मार्गे विष्णुदास भावे नाट्यगृहापर्यंत विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली होती. देशभक्तीपर गीतांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी तिरंगा झळकवित तसेच 'भारत लोकशाहीची जननी', 'लोकशाहीच्या ऊर्जेला सलाम' असे फलक उंचवित रॅलीत उत्साहाने सहभाग घेतला. नाट्यगृहामध्ये प्रदर्शित करण्यात आलेल्या 'लोकशाही चिरायू होवो' या कोऱ्या फलकावर वनमंत्री ना.श्री.गणेश नाईक, आ.श्रीम.मंदाताई म्हात्रे, आ.श्री.शरद सोनावणे, अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार तसेच उपस्थित अधिकारी व नागरिकांनी स्वाक्षरी करुन तो फलक साक्षांकित केला. यावेळी केंद्र सरकारने विशेष प्रदर्शित केलेल्या आणीबाणी विषयक लघुपटाचे प्रक्षेपण करण्यात आले. तसेच ठाणे जिल्हा माहिती कार्यालयामार्फत बनविण्यात आलेल्या आणीबाणीत सहभागी झालेल्या ठाणे जिल्हयातील व्यक्तींच्या मनोगताची चित्रफितही प्रदर्शित करण्यात आली. व्यासपीठावर ठेवण्यात आलेली राजदंडाची (SENGOL) प्रतिकृती लक्षवेधी* होती. आणीबाणीच्या ५० व्या वर्षपूर्तीचा हा कार्यक्रम संविधानाबाबतचाआदर व राष्ट्राभिमान दर्शवित लोकशाहीचा सर्वार्थाने जागर करणारा होता. यानिमित्त विष्णुदास भावे नाट्यगृह येथे प्रदर्शित करण्यात आलेले आणीबाणीविषयक माहितीपूर्ण छायाचित्र प्रदर्शन पुढील महिनाभर तेथे ठेवण्यात येणार असून त्याठिकाणी नागरिकांनी आवर्जून भेट दयावी असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

टाटा मोटर्सने हॅरियर इव्हीच्या प्रारंभिक किंमतींची घोषणा केली

मुंबई, दि. २७: टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या चार-चाकी इव्ही उत्पादकाने आज भारतात बनलेल्या सर्वात दमदार एसयूव्ही हॅरियर.इव्हीच्या प्रारंभिक किंमतींची घोषणा केली. केवळ या उद्योगातच नाही, तर जगात नवीन असलेली इनोव्हेशन्स आणि बॅटरी पॅकवर आजीवन वॉरंटीसह सुलभ मालकी प्रदान करण्याबाबतची कंपनीची वचनबद्धता दर्शविणाऱ्या हॅरियर.इव्हीने केवळ आपली विश्वासार्हता मजबूत केलेली नाही, तर सुपर-कार सारखा परफॉर्मन्स, कुठेही घेऊन जाऊ शकणारी ऑफ-रोड क्षमता, आकर्षक टेक्नॉलॉजी आणि आलीशान आरामदायकता प्रदर्शित करून भविष्याची अल्टीमेट एसयूव्ही म्हणून स्वतःला प्रस्थापित केले आहे.

२ जुलै पासून हॅरियर.इव्हीचे बुकिंग सुरू होत आहे. रियर-व्हील ड्राइव्ह (आरडब्ल्यूडी) द्वारा संचालित प्रकारासाठीच्या प्रारंभिक किंम ती २१.४९ लाखांपासून सुरु होत आहेत. हॅरियर.इव्ही ॲडव्हेंचर ६५ची किंमत २१.४९ लाख रुपये, ॲडव्हेंचर एस ६५ ची किंमत २१.९९ लाख रुपये, फियरलेस+ ६५ ची किंमत २३.९९ लाख रुपये, फियरलेस+ ७५ ची किंमत २४.९९ लाख रुपये आणि एम्पॉवर्ड७५ ची किंमत २७.४९ लाख आहे. हॅरियर.इव्हीच्या स्पर्धात्मक किंमती ठेवण्याच्या धोरणाविषयी टिप्पणी करताना टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेडचे चीफ कमर्शियल ऑफिसर श्री. विवेक श्रीवास्तव म्हणाले, हॅरियर.इव्ही सह एका सुपरकार प्रमाणे बेजोड परफॉर्मन्स देण्याची, कुठेही ऑफ रोड जाण्याची, आलिशान आरामदायकता देण्याची एका एसयूव्हीची खरी क्षमता उघड करण्याची आमची इच्छा आहे.

जाहीर नोटिस

सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, श्री. दिनेश बाबुराव बेरीशेट्टी हे इ. क्र. ४६, कन्नमवार नगर सहयोग सह. गृह. संस्था मर्या., नोंदणी क्र. BOM(WS)/HSG (OH)/१८१३/८५-८६, कन्नमवार नगर-१, विक्रोळी- पूर्व, मुंबई-४०० ०८३, येथे खोली क्र. १००९ चे मालक आहेत. श्री. दिनेश बाबुराव बेरीशेट्टी हे सदर संस्थेचे नोंदणीकृत सदस्य आणि संस्थेद्वारा वितरीत भाग प्रमाणपत्र क्र. ३४ अंतर्गत अनु. क्र. १६६ ते १७० (दोन्ही सह) प्रत्येकी रु. ५०/- किमतीच्या पाच भागांचे भागधारक आहेत. श्री. दिनेश बाबुराव बेरीशेट्टी यांनी संस्थेचे पूर्वीचे सभासद श्रीम. थनिया नारायण नायका यांच्याकडून दि. २९/१०/१९९६ रोजीच्या विक्री खतानुसार सदर खोली विकत घेतलेली आहे. श्री. दिनेश बाबुराव बेरीशेट्टी यांच्याकडून संस्थेद्वारे वितरित केलेले सदर खोलीचे मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ३४ गहाळ झाले आहे.

जर श्री. दिनेश बाबुराव बेरीशेट्टी यांच्या व्यतिरिक्त जर कोणा अन्य व्यक्तिस सदर खोलीबाबत विक्री, बक्षीस, मालकी हक्क, अधिभार, वारसाहक्क, ताबा, वहिवाट किंवा लाभार्थी अधिकार किंवा हित असल्यास त्यांनी लेखी स्वरूपात आवश्यक कागदोपत्री पुराव्यांसह खालील स्वाक्षरीकर्त्याकडे सदर सूचना प्रकाशनापासून १५ दिवसांच्या आत कळवावे. अन्यथा कोणालाही कोणताही दावा नाही आणि असल्यास सर्व इच्छा व उद्देशांकरिता ते त्याग केले आहे, असे समजले जाईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २६/०६/२०२५

सही/-
कन्नमवार नगर सहयोग सह. गृह. संस्था मर्या.,
इ. क्र. ४६, कन्नमवार नगर-१,
विक्रोळी- पूर्व, मुंबई-४०० ०८३.

जाहीर नोटिस

सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, श्री. प्रफुल्लकुमार निशिकांत दत्ता हे इ. क्र. ४६, कन्नमवार नगर सहयोग सह. गृह. संस्था मर्या., नोंदणी क्र. BOM(WS)/HSG (OH)/१८१३/८५-८६, कन्नमवार नगर-१, विक्रोळी- पूर्व, मुंबई-४०० ०८३ येथे खोली क्र. १०२१ चे मालक आहेत. श्री. प्रफुल्लकुमार निशिकांत दत्ता हे सदर संस्थेचे नोंदणीकृत सदस्य आणि संस्थेद्वारा वितरीत भाग प्रमाणपत्र क्र. २२ अंतर्गत अनु. क्र. १०६ ते ११० (दोन्ही सह) प्रत्येकी रु. ५०/- किमतीच्या पाच भागांचे भागधारक आहेत. सदर सभासद श्री. प्रफुल्लकुमार निशिकांत दत्ता यांचे दि. १६/०१/२०१३ रोजी निधन झाले असून यांच्या पश्चात यांच्या पत्नी श्रीम. आरती प्रफुल्लकुमार दत्ता आणि कु. प्रतिमा प्रफुल्ल दत्ता आणि कु. पायल प्रफुल्ल दत्ता या दोन मुली हेच फक्त त्यांचे वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी आहेत.

वर नमूद व्यक्तीच्या व्यतिरिक्त जर कोणा अन्य व्यक्तिस सदर खोलीबाबत विक्री, बक्षीस, मालकी हक्क, अधिभार, वारसाहक्क, ताबा, वहिवाट किंवा लाभार्थी अधिकार किंवा हित असल्यास त्यांनी लेखी स्वरूपात आवश्यक कागदोपत्री पुराव्यांसह खालील स्वाक्षरीकर्त्याकडे सदर सूचना प्रकाशनापासून १५ दिवसांच्या आत कळवावे. अन्यथा कोणालाही कोणताही दावा नाही आणि असल्यास सर्व इच्छा व उद्देशांकरिता ते त्याग केले आहे, असे समजले जाईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २६/०६/२०२५

सही/-
कन्नमवार नगर सहयोग सह. गृह. संस्था मर्या.,
इ. क्र. ४६, कन्नमवार नगर-१,
विक्रोळी- पूर्व, मुंबई-४०० ०८३.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that **M/s. PREM KIRAN Co. operative Housing Society Ltd.**, Plot no. 195, Andheri – East, Mumbai – 400093. Bearing C.T.S No. 368/45 bearing Original Share Certificate no.1303 issued dated 01.09.1963 has been reported lost / misplaced and an application has been made by them to the society for issue of duplicate Share Certificate at present it is in the name of **Mr. INDRAJIT SINGH SAIGAL**. The Society hereby invites claims, demands or objection (in writing) for the issuance of duplicate Share Certificate within the period of 15 (Fifteen) days from the date publication of this notice. If no claims / objections are received during this period the Society shall be free to issue duplicate Share Certificate with necessary transfer from **Mr. INDRAJIT SINGH SAIGAL** , to Society name **M/S PREM KIRAN Co.operative Housing Society Ltd.**,

Sd/-
Chairman / Hon. Secretary
For. Sher-e-Punjab Chs Ltd.,
Place Mumbai

Dated : 26/06/2025

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that **M/s. THE SILVER ARCH Co. operative Housing Society Ltd.**, Plot no. 298, Andheri – East, Mumbai – 400093. Bearing C.T.S No. 368/17 bearing Original Share Certificate no.1316 issued dated 13.11.1990 has been reported lost / misplaced and an application has been made by them to the society for issue of duplicate Share Certificate at present it is in the name of **Mr. KARUNA BHAGNANI** . The Society hereby invites claims, demands or objection (in writing) for the issuance of duplicate Share Certificate within the period of 15 (Fifteen) days from the date publication of this notice. If no claims / objections are received during this period the Society shall be free to issue duplicate Share Certificate with necessary transfer from **Mr. KARUNA BHAGNANI** , to Society name M/S **THE SILVER ARCH Co.operative Housing Society Ltd.**,

Sd/-
Chairman / Hon. Secretary
For. Sher-e-Punjab Chs Ltd.,
Place Mumbai

Dated : 26/06/2025

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that my client **Mr. Nikhil Omprakash Vyas (Age 23 Years)** is the one of the co-claimant / owner and possession of his deceased father **Late Omprakash Damodar Vyas** flat property at B – 105, Damodar Bhauvan CHS Ltd., Janata Nagar Road, Opp Poddar School, Bhayander West, Thane – 401101. Along with his mother **Smt. Vijaya Omprakash Vyas (Age 51 Years), Brother Mr. Dhiraj Omprakash Vyas (Age 30 Years) and sister Miss. Kajal Omprakash Vyas (Age 25 Years).**

That my client lost / misplaced original chain documents i.e Builders to his late father's name **Omprakash Damodar Vyas** Agreement along with share certificate issued by Damodar Bhuvan CHS Ltd. Lost Report for the same lodged by my client with Bhayander Police Station vide Registered ID : 7479/2025 on 24th June 2025.

Hence this public notice circulate addressing to all persons having objection or claiming an interest in the said property or any part thereof by way of sale, gift, lease, inheritance, exchange, mortgage, charge, lien, trust, possession, easement, attachment or otherwise howsoever are hereby required to make the same known to the undersigned at my office address given below within **7 days** from the date hereof, failing which without any reference to such claim and the same, if any, shall be considered as waived. And my client approached to appropriate authority to apply documents for the same.

Dharmendra Patel
(Advocate High Court)
Shop No.68, Mahesh Nagar Building No.6, Station Road, Bhayander West, Thane – 401 101

Date: 26/06/2025

जाहीर नोटिस

जाहीर नोटीस

वसई येथील मा. श्री. आर एच नाथानी, सह दिवाणी न्यायाधिश,
वरिष्ठ स्तर, वसई यांचे न्यायालयात
विशेष दिवाणी दावा क्र. २६२/२०२४

नि. क्र. १५
ने.ता. ०५/०७/२०२५

अब्दुल करीम काझी ...वादी

विरुद्ध

मोहम्मद खालिद शेख व इतर ...प्रतिवादी

प्रति,
प्रविण काशिनाथ दळवी
पत्ताः श्रम साफल्य बंगला,
संतोष भुवन, बावशेत पाडा रोड,
नालासोपारा (पूर्व), वसई- ४०१२०८

ज्याअर्थी सदरचे वादी ह्यांनी मे. सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वसई यांच्या कोर्टात प्रस्तुतचा विशेष दिवाणी दावा क्र. २६२/२०२४ दाखल केला आहे.

त्याअर्थी असे जाहिर करण्यात येते की सदरहु विशेष दिवाणी दावामध्ये, प्रतिवादी क्र. २ यांच्यावर प्रत्यक्ष नोटीसीची बजावणी झालेली नसल्यामुळे ही जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. तरी सदर प्रतिवादी क्र. २ अगर त्यांचे प्रतिनिधींनी त्यांची बाजू मांडण्यासाठी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत उपरनिर्दिष्ट प्रकरणी सामील होउन आपले लेखी म्हणणे नोंदवावे आणि तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की सदरहु मुदतीत आपले लेखी म्हणणे न आल्यास न्यायालय वादीचे म्हणणे ऐकून प्रस्तुतच्या अर्जात निकाल देण्यात देईल याची संबंधीताची नोंद घ्यावी. सदर प्रकरणी पुढील तारीख ०५/०७/२०२५ रोजी नेमण्यात आली आहे.

आज दि. २७/०५/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

Seal

हुकुमावरुन
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर, वसई

नमुना क्र.आयएनसी-२६

कंपनी (स्थापना) अधिनियम, २०१४ चे नियम ३० नुसार)

क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, मुंबई, सहकार मंत्रालय, मुंबई यांच्या समक्ष

कंपनीचे नाव: वाघानी टेक्नो-बिल्ड लिमिटेड
सीआयएन: एल७४९९९एमएच१९९४पीएलसी१८७८६६
नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता: ९०३ व ९०४, ९वा मजला, कृषल कमर्शियल टॉवर, घाटकोपर-माहुल रोड, चेंबूर (पश्चिम), मुंबई-४०००९, महाराष्ट्र, भारत.

जाहीर सूचना
कंपनी कायदा २०१३ चे कलम १३(४)
आणि
वाघानी टेक्नो-बिल्ड लिमिटेड (सीआयएन:एल७४९९९एमएच१९९४पीएलसी१८७८६६)
यांचे नोंदणीकृत कार्यालय: **९०३ व ९०४, ९वा मजला, कृषल कमर्शियल टॉवर, घाटकोपर-माहुल रोड, चेंबूर (पश्चिम), मुंबई-४०००९, महाराष्ट्र, भारत.**

सर्वसामान्य जनतेस येथे सूचना देण्यात येत आहे की, **१२ मे, २०२५** रोजी ई-वोटिंग मार्फत टपाल मतदानाद्वारे झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर विशेष ठरावानुसार कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय **महाराष्ट्र राज्यातून गुजरात राज्यात** स्थलांतरीत करण्याकरिता कंपनीचे मेमोरँण्डम ऑफ असोसिएशनचे बदलण्याच्या निश्चितीसाठी कंपनीद्वारे केंद्र शासन यांच्याकडे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३ अंतर्गत अर्ज करण्याचे योजिले आहे.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३(४) अन्वये आवश्यकतेनुसार सदर ठरावाप्रमाणे कंपनीने क्षेत्रिय संचालक (पश्चिम क्षेत्र, मुंबई) यांच्याकडे त्यांची मान्यता घेण्यासाठी अर्ज करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

कोणा व्यक्तिच्या हितास कंपनीचे नोंदणीकृत कार्यालयाच्या नियोजित बदलामुळे काही बाधा येत असल्यास त्यांनी त्यांच्या हिताचे स्वरूप व विरोधाचे कारण नमूद केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांचे आक्षेप रजि. पोस्टाने सदर सूचना प्रकाशन तारखेपासून १४ दिवसांच्या आत **क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, मुंबई** पत्ता: **एव्हरेस्ट, ५वा मजला, १००, मरिन ड्राईव्ह, मुंबई-४००००२, महाराष्ट्र** या कार्यालयात पाठवावी तसेच एक प्रत अर्जदार कंपनीला खाली नमुद त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावे.

अर्जदार/याचिकाकर्त्यांच्या वतीने व करिता
वाघानी टेक्नो-बिल्ड लिमिटेडकरिता
सही/-
जतिनकुमार तुलसिभाई पटेल
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन:०१४७३१५८)

दिनांक: २५.०६.२०२५
नोंदणीकृत कार्यालय: ९०३ व ९०४, ९वा मजला, कृषल कमर्शियल टॉवर, घाटकोपर-माहुल रोड, चेंबूर (पश्चिम), मुंबई-४०००९, महाराष्ट्र, भारत.

इंडसइंड बँक लिमिटेड

१ला मजला, संगम टॉवर चर्च रोड, जयपूर-३०२००१.

मागणी सूचना (सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ३(१) नुसार)

सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये कलम १३ (२) च्या प्रतिस्थापित सेवा खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना नोटीस देण्यात आली आहे की, त्यांनी **इंडसइंड बँक लिमिटेड (आयबीएल)** कडून घेतलेल्या मालमत्तेवरील कर्जाची परतफेड करण्यात चूक केली असल्याने, त्यांच्या कर्जाच्या रोजी रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सुविधेचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर, बँकेने संबंधित कर्जदार/सह-कर्जदारास सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये कलम १३(२) च्या (सरफायसी कायदा) अंतर्गत नमूद केलेल्या शेवटच्या ज्ञात पत्त्यांवर मागणी सूचना जारी केल्या आहेत. त्याद्वारे कर्जदारांना बोलावून त्यांच्याकडून संबंधित मागणी सूचनेमध्ये नमूद केलेली संपूर्ण थकबाकी रक्कम संबंधित सूचनांच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत खाली दिलेल्या तपशिलानुसार परत करण्याची मागणी केली जाते, तसेच खाली नमूद केलेल्या रकमेवरील करार दराने पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. या मागणी नोटिसमध्ये नमूद केल्याप्रमाणे. तथापि, सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, २००२ (सरफायसी नियम) च्या नियम ३ नुसार या प्रकाशनाद्वारे आमच्याद्वारे सेवा देखील केली जात आहे:

कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव व पत्ता	मागणी सूचना दिनांक आणि थकबाकी रक्कम	प्रतिभूत मालमत्ता/तारण मालमत्तेचे वर्णन
१. श्री. आसिफ नाझिर खान (कर्जदार/तारणकर्ता), २. श्रीमती ममता आसिफ खान (सह-कर्जदार)	मागणी सूचना दिनांक: १६.०६.२०२५ दिनांक ०८ मे, २०२५ रोजी रोजी देय रक्कम रू.१,१४,९६,५३४.३६ (रुपये एक कोटी चौदा लाख शहाण्णव हजार पाचशे चौतीस आणि पैसे छत्तीस फक्त) तसेच पुढील व्याज आणि त्यावरील इतर खर्च. एनपीए दिनांक: ०७ मे, २०२५ कर्ज खाते क्र.७७३०००२५५६३, ७७८०००० १९६६६, ७७६०००००८७९६ (गृहकर्ज)	फ्लॅट क्र.२९०४, क्षेत्रफळ ७१३ चौ.फु. (कार्पेट) क्षेत्र अर्थात ६६.२४ चौ.मी. (कार्पेट) क्षेत्र, २६वा मजला, तसेच बी विंगमधील एक पोडियम कार पार्किंग, रुस्तमजी अज्झीआनो ए बी सी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., रुस्तमजी अर्बनिया म्हणून ज्ञात प्रकल्प, जमीन सर्व्हे क्र.१४/१(भाग), १५/२(भाग), १५/३(भाग), १५/४(भाग), १५/५(भाग), १६/२ए(भाग), १६/३, १६/४, १६/५(भाग), १६/६(भाग), १७/३(भाग), १७/४ए(भाग), १७/५(भाग), १७/६ए(भाग), गाव माजिवडे, पुर्व द्रुतगती महामार्गालगवळ, माजिवडे, ठाणे (पश्चिम)-४००६०१, ठाणे महानगरपालिकेच्या मर्यादित आणि नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा ठाणे येथील मालमत्तेचे सर्व भाग व खंड. **उत्तर:** अधिकार दस्तावेजानुसार; **पुर्व:** अधिकार दस्तावेजानुसार; **पश्चिम:** अधिकार दस्तावेजानुसार; **दक्षिण:** अधिकार दस्तावेजानुसार;

आम्ही याद्वारे येथे नमूद केलेल्या कर्जदाराला या नोटिसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, संबंधित डिमांड नोटिसमध्ये नमूद केलेल्या अधिक विशिष्टतेची थकबाकी रक्कम, त्यावरील पुढील व्याज तसेच खर्च, शुल्क, खर्च इ. सह देण्याचे आवाहन करतो जे अयशस्वी झाले तर या कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये वरील सुरक्षित मालमत्ता/अचल मालमत्तेच्या विरोधात कारवाई करण्यास आम्ही स्वातंत्र्य देऊ आणि लागू नियमांनुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे आणि विक्री करणे एवढ्यापुरते मर्यादित नाही. कर्जदार/सह-कर्जदार/कायदेशीर वारसदार/कायदेशीर प्रतिनिधी तुमच्या स्वतः च्या खर्चावर आणि परिणामांवर, कृपया लक्षात घ्या की सरफायसी कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, तुम्हा सर्वांना बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टी किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यास मनाई आहे. तुम्ही वरील कलमाचे कोणतेही उल्लंघन केल्यास सरफायसी कायद्याच्या कलम २९ आणि/किंवा या संदर्भात इतर कोणत्याही कायदेशीर तरतुदीनुसार दंडात्मक तरतुदी लागू केल्या जातील. कृपया लक्षात घ्या की, कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) नुसार, **आयबीएलची** थकबाकी आणि **आयबीएलद्वारे** केलेले सर्व खर्च, शुल्क आणि खर्च **आयबीएलला** विक्री किंवा हस्तांतरणासाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी कधीही सादर केले असल्यास, सुरक्षित मालमत्ता **आयबीएलद्वारे** विकली किंवा हस्तांतरित केली जाणार नाही आणि त्या सुरक्षित मालमत्तेच्या हस्तांतरण किंवा विक्रीसाठी **आयबीएलद्वारे** कोणतेही पाऊल उचलले जाणार नाहीं: कर्जदार/सह-कर्जदार, विशेषतः, आणि सर्वसाधारणपणे, सार्वजनिकपणे, याद्वारे मालमत्तेशी व्यवहार न करण्याची खबरदारी देण्यात आली आहे आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार **इंडसइंड बँक लिमिटेडच्या** शुल्काच्या अधीन असेल, त्यावरील रक्कम आणि व्याज.

दिनांक: २६.०६.२०२५, ठिकाण: ठाणे **सही/- प्राधिकृत अधिकारी - इंडसइंड बँक लिमिटेडकरिता**

जाहीर सूचना

याद्वारे माझ्या अशिल **श्रीमती शझमा युसूफ कापडिया डॉ/ऑफ युसूफ घुमरा** यांच्या वतीने कळविण्यात येते की, त्या श्री. युसूफ सुलेमान घुमरा यांच्या कायदेशीर वारसांपैकी एक आहेत. श्री. युसूफ सुलेमान घुमरा हे डुप्लेक्स क्र. ०१ तळमजला, ए विंग, सेंटेलाईट पार्क ए विंग को-ऑप. हाऊसिंग सोसा. लि., ग्रीन कोर्ट क्लब जवळ, हटकेश, मीरा भायंदर रोड, मीरा रोड (पू), ता. व जि.-ठाणे-४०१९०७ या मालमत्तेचे मालक होते. मे. ग्रेस बिल्डर्स यांनी सदर डुप्लेक्स श्रीमती रीटा हरिश्चंद्र झा आणि श्री. हरिश्चंद्र रघुनंदन झा यांना दिनांक १३.०९.२००६ रोजीच्या विक्री कराराद्वारे विकले होते. श्रीमती रीटा हरिश्चंद्र झा आणि श्री. हरिश्चंद्र रघुनंदन झा यांनी सदर डुप्लेक्स श्री. हर्ष कुमार यांना दिनांक २७.१२.२००७ रोजीच्या विक्री कराराद्वारे विकले. श्री. हर्ष कुमार यांनी सदर डुप्लेक्स श्री. युसूफ सुलेमान घुमरा यांना दिनांक २२.०७.२०१० रोजीच्या विक्री कराराद्वारे विकले होते. श्री. युसूफ सुलेमान घुमरा यांचे दिनांक १२.१०.२०२४ रोजी मीरा रोड (पू) येथे निधन झाले. उपरोक्त व्यक्तीच्या निधनानंतर त्यांच्यामागे १. श्रीमती सलमा युसूफ घुमरा (पत्नी) २. श्रीमती शझमा युसूफ कापडिया (मुलगी) हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. दिनांक २१.०२.२०२५ रोजीच्या हक्कसोड पत्राद्वारे, श्रीमती सलमा युसूफ घुमरा यांनी सदर डुप्लेक्समधील त्यांचे हक्क, अधिकार, पद आणि हित त्यांची मुलगी श्रीमती शझमा युसूफ कापडिया डॉ/ऑफ. युसूफ घुमरा यांच्या नावाने सोडले आहे. त्यानंतर, त्यांनी सोसायटीकडे सदर डुप्लेक्सचे १००% शेअर्स त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला आहे.

जर कोणत्याही व्यक्तीला माझ्या अशिलाच्या विरोधात उपरोक्त डुप्लेक्सच्या हस्तांतरणासंदर्भात किंवा उपरोक्त मालमत्तेच्या